# अल्केमिस्ट्रीचा ओनामा

**माझ्या आयुष्यातल्या मला शुभंकर वा भयंकर वाटणाऱ्यांसोबत माझी अशीच अल्केमिस्ट्री जुळून जाते. तीच अल्केमिस्ट्री मी पुढच्या आठवड्यापासून लोकप्रभाच्या वाचकांसाठी आणतोय. या अल्केमिस्ट्रीत जी माणसं तुम्हाला भेटतील त्यांनी माझ्या आयुष्यावर प्रयोग केलेत. मी ही त्यांच्या आयुष्यावर प्रयोग केलेत. पण आम्ही नेहमीच एकमेकांना भेटलोय असं नाही.**



राजू परुळेकर

माणसं जग बदलतात. रस्ते बांधतात. युद्ध करतात. पूल बांधतात. समुद्र पार करतात. आश्वासनं देतात. फसवतात. प्रेम करतात. खून करतात. कायदे बनवतात. ते तोडतात. गँग बनवतात. जीव घेतात. मरणाऱ्या माणसाला जगवतात. जिवंत आईला नेऊन स्मशानात टाकतात. मेलेल्या आईला कवटाळून वर्षानुवर्षे खोलीत बंद करून ठेवतात. आठ-आठ वर्षे प्रेम करून लग्न करतात. नंतर सहा महिन्यात घटस्फोट घेतात. आधी भागीदारी करतात. मग ती तोडून वर्षानुवर्षे दिवाणी दावे लढतात. प्रेमात पडतात. लग्न करतात. विवाहबाह्य संबंधही ठेवतात.

अशी ही माणसं. ती राजकारणात असतात, समाजकारणात असतात, उद्योगात असतात, ती कधी कधी तर कुणीच नसतात. तरीही ती आपल्याला जाणवत राहतात. आपल्या मनात घर करून राहतात. कित्येकदा आपण एखादा गँगस्टर किंवा डॉनचं नाव ऐकून असतो. ते नाव ऐकून आपल्या मनात त्याची काही एक प्रतिमा तयार झालेली असते. वास्तवात तो भेटतो, बोलतो तेव्हा तो अगदीच अतिसामान्य वाटतो. अगदी एखाद्या मुलीबाबतही हेच घडतं. ही निसर्गाचीच किमया आहे असं मला वाटतं. नाही तर मित्र, पती-पत्नी, एकेकाळचे भागीदार यांच्या सर्वात जास्त केसेस हायकोर्टात पेंडिंग असाव्यात? या माणसांपैकी काही माणसं आपल्याला भेटतात. काही भेटत नाहीत. गंमतीचा भाग हा की कित्येकदा ही न भेटणारी माणसंच आपल्या आयुष्यावर घनघोर परिणाम घडवतात. आपलं आयुष्य बदलवणारी माणसं बऱ्याचदा आपल्याला न भेटलेलीच असतात.

माझ्या आयुष्यात (हा शब्द थोडा म्हातारा वाटतो. पण असो.) मी अशा अनेक सानथोरांच्या

॥ मायेचा सौंदर्य सल्ला ॥

गौरी गणपतीचा हा महिना. ह्या महिन्यात सणांमुळे स्वतःकडे बघायला जरा कमी वेळ मिळतो. तरीही गौरीसारख्या हक्काने नटण्याचा हा काळ. हळदी कुंकु, गणपतीचे दहा दिवस लोकांचे येणे. ह्या वेळी घरातील प्रत्येक स्त्री मुलीने प्रसन्न दिसणे आवश्यक. ब्युटिकने ह्यासाठी केसांसाठी प्रथिनयुक्त "प्रोटीन कंडीशनरची" सोय केली आहे. केस धुतल्यावर कंडीशनर ओल्या केसांवर लावा व कंगव्याने टोकापर्यंत विंचरुन लावा. पाच मिनीटांनी धुवून टाका.चमकदार रेशमासारख्या केसांचे " प्रोटीन कंडीशनर " हे गुपित आहे. तसेच दमलेल्या चेहे-याला पाच मिनीटांत तजेलदार बनवण्यासाठी कपीला मंजीस्ट, वाळा, चंदन वनस्पतींचा अर्क याचा वापर करुन बनवलेला ब्युटिकचा "कोमल" ब्युटी मास्क हे तर वरदानच. चेहे-यावर "कोमलचा" पातळ थर लावा, कडक वाळल्यानंतर पाण्याने धुवून टाका. बघा तुमचा शीण पाच मिनीटांत चेहे-यावरुन नाहिसा होतो की नाही.

– माया परांजपे

ADVT